# * प्रकरण चौथे *

# अरुणा ढेरे यांच्या ललितलेखनाची भाषाशैली

# प्रकरण चौथे

# अरूणा ढेरे यांच्या ललित लेखनाची भाषाशैली

प्रास्ताविक

४.१ लेखनविशेष

४.२ नागर

४.३ संवाद

४.४ काव्यमय शैली

४.४.१ बालमनातील कविता.

४.४.२ बोरकर, कुसुमाग्रज, ग्रेस, तांबे, खानोलकर, कोल्हटकरांच्या दिव्य अर्थ प्रकट करणाऱ्या कविता.

४.४.३ संत कबीरांचे दोहे.

४.४.४ अक्क महादेवीची वचने.

४.४.५ महादेवी वर्मांच्या कविता.

४.४.६ केळकरांच्या स्पष्ट कविता.

४.४.७ विश्ववर्णन–मुक्तेश्वरांचे

४.४.८ संत रामदासांचे श्लोक.

४.४.९ लोकगीते.

४.५ लोकसंस्कृती.

४.५.१ ओव्या.

४.५.१.१ पावसाच्या ओव्या.

४.५.१.२ स्त्रीच्या जीवनाचे पदर उलघडणाऱ्या ओव्या.

४.५.१.३ पतीच्या आमरणाविषयीची ओवीगीते.

४.५.२ लोककथागीते

४.५.२.१ चंद्रावळ आणि राहीचे लोककथागीत.

४.५.२.२ कुणब्याचे लोककथागीत.

४.५.२.३ नवलाखी हाराचे गाणे.

४.५.३ लावणी

४.५.४ जागरण

४.५.५ दशावतार

४.५.६ चित्रकथी

४.५.७ बाहुल्या : नाट्याची गंगोत्री.

४.५.८ लोकसाहित्यातील दैवते.

४.५.९ पुराण आणि कीर्तन : एक अनुबंध.

४.५.१० दासबोधातील कीर्तनविचार.

**४.६ लोकमानस.**

**४.७ वेध घेणारी भाषा.**

**४.८ अनुभव अभिव्यक्तिची रचना.**

**४.९ भाषाशैली.**

# प्रकरण चौथे

# अरूणा ढेरे यांच्या ललित लेखनाची भाषाशैली

**प्रास्ताविक –**

मागच्या तीन प्रकरणांमध्ये आपण 'साठोत्तरी ललितगद्य लेखन : स्वरूप विशेष', 'अरूणा ढेरे यांच्या ललितलेखनाच्या प्रेरणा व स्वरूप', 'मनातलं आभाळ' व 'आठवणींतले आंगण' या ललितलेखसंग्रहांतील चित्रण विविधता यांचा आपण अभ्यास केला.

या प्रकरणात आपण अरूणा ढेरे यांच्या ललित लेखनाच्या भाषाशैलीचा अभ्यास करूया. त्यांची लेखनशैली, काव्यशैली, वेध घेणारी भाषा, अनुभव अभिव्यक्तीची रचना कशी केलेली आहे या घटकांचा अभ्यास करूया.

प्रत्येक लेखकाची स्वत:ची अशी लेखनशैली असते. त्याने वापरलेल्या भाषेतूनसुद्धा भाषाशैलीचा वेगळेपणा जाणवतो. अरूणा ढेरे यांच्या लेखनाची शैली ही संस्कृत प्रचुर पण साधी, सरळ, सोपी व रोजच्या जीवनातीलच आहे.

हृदयाला स्पर्श करणारी, आत्मशोध घेणारी भाषा त्यांच्या लेखनातून आढळते. काव्यमयतेचा स्पर्श बेमालूमपणे असणारी भाषा त्यांनी वापरलेली आहे. कारण, काव्य हे त्यांच्या मनातच रुजलेले आहे. कुठे साधी, सरळ, सोपी वाक्ये त्यांच्या लेखनात आढळतात. आकलनास सोपी भाषा वाटते. पण कुठे, जब्रांभीर शब्दकळा असलेली परिणामकारक भाषाशैली त्यांच्या लेखनात जाणवते. रस, गंध, रंग,स्पर्श यांच्या संवेदनांची भाषा त्यांच्या लेखनातून स्पष्ट होते.

ग्रामीण वातावरणाला व वर्णनाला शहरी भाषेचा साज त्यांनी घातलेला आहे.

## ४.१ लेखनविशेष

१) लहानपणात मनात आलेले विचार, भावना, कल्पना आणि पाहिलेलं विश्व जसंच्या तसं वर्णन केलेलं आहे.

२) जीवनसुलभ गोष्टींचा धागा पकडून त्यांनी त्याचा गर्भीतार्थ हा तत्ववेत्त्यालाही थक्क करेल इतका सुंदर काढलेला आहे.

३) शाश्वत सत्याची पूर्णपणे जाण आणि भोवतालच्या प्राणी, निसर्ग, पक्षी यांच्यातील कालानुक्रमे होत असणारे बदल यांच्या बारीक अन् बारीक हालचालींना विचारांचे ताण देऊन त्यांनी दृष्टांत दिले आहेत.

४) तत्कालीन समाज जीवन आणि सध्याचे वर्तमान जीवन यांच्यामध्ये असणारा फरक हा प्रकर्षाने त्यांच्या लेखनाचा विषय झाल्याचे आढळते.

५) कोणत्याही प्रकारचा रिकामेपणा त्यांच्या लेखनात आढळत नाही. जर, प्रणयाचे वर्णन आहे, वासनेविषयीची घटना आली तर ते न वगळता किंवा अतिशयोक्ती न करता जसेच्या तसे लेखनाच्या ओघात आलेले आहे. व ज्या त्या ठिकाणी ते योग्यच आहे.

६) एका शब्दाचा स्मरणशक्ती आणि बुद्‌ध व जीवनानुभव यांच्या पातळीवर शाश्वत आणि आशाश्वत अर्थ अगदी बेमालूमपणे लावलेला आपणांस आढळून येतो.

७) जगाच्या सुखदु:खांना सामावून घेणारी, करूणेच्या क्षितिजापर्यंत पसरलेली, मूल्यनिष्ठंनी झगमगणारी मनं त्यांच्या लेखनातून अवतरलेली दिसतात.

८) पाऊस, तहान, सूर्यास्त, श्रावणसरी, नदीकिनारी, दीपत्कार, यांसारख्या एका एका शब्दाच्या भोवती मनाच्या पटलावर येणाऱ्या सर्व विचारांचे जाळे सुरेख पद्धतीने गुंफलेले आहे.

९) निसर्गातील घटक, त्यांचे मन आणि मानवी मन यांची गुंफन केली आहे. 'पाऊस आणि धरती' यांचे उदाहरण देऊन स्पष्ट केलेले आहे.

११) असामान्य व्यक्तिमत्वाच्या माणसांच्या गुणांची कदर लेखनात केलेली आहे. त्या व्यक्तिंच्या जीवनाचे पैलू उघड करून दाखवलेले आहेत.

१०) चांगले आणि वाईट यांच्यातील फरक काय ? काल आणि आज तफावत काय आढळते ? या गोष्टींची जाण त्यांचे लेखन करून देते.

**४.२ नागर :**

नागर भाषा वापरून अरूणा ढेरे यांनी ग्रामीण जीवनाचे दर्शन वाचकांना घडवून आणलेले आहे. तसेच ग्रामीण जीवनाचे, संस्कृतीचे हुबेहूब वर्णन करून ते शहरी व नागर संस्कृतीपेक्षा कसे श्रेष्ठ होते व आता ते लोप पावले आहे. त्यामुळे लेखिकेला होणारे दुःख लेखिकेच्या प्रत्येक ललितलेखात दिसून येते. नागरीकरण, आधुनिकीकरण व आधुनिकतेच्या नावाखाली बदललेले जीवन हे किती कुचकामी आहे व कसे आहे याचे हुबेहूब वर्णन नागर भाषेतून लेखिकेने केले आहे.

पूर्वीची ग्रामसंस्कृती नाश पावत चालली आहे व नागरीपणाचे वेष्टन त्या संस्कृतीला कशा व्यंगात्मक पद्धतीने चिकटवले जात आहे. मूळ ग्रामजीवन कसे ऱ्हास होत आहे, याचे वर्णन लेखिकेच्या लेखनातून आढळते.

नागर भाषेतून ग्रामजीवनातील वर्णन. त्याबरोबरच ग्रामीण भागातील मनाला स्पर्श करणारे लेखन लेखिकेने केले आहे. ग्रामीण भागातील लोकांना आपले प्रातिनिधीक स्वरूपात केलेला अभ्यास पाहून या साहित्याकडे तो आपलेपणाने पाहतो.

## ४.३ संवाद

ग्रामसंस्कृतीमधील संवाद आज दुर्मिळ होत आहेत. अशातच पूर्वीची एकत्रित कुटुंबपद्धती व लोकसंस्कृती ग्रामजीवनातील संवाद आपल्याला अरूणा ढेरेंच्या लेखनातून दिसून येतात. नातेसंबंधाच्या अनुषंगाने आलेली संबोधने वाचताना वाचकाला आपल्या अवती-भोवतीच्या संबंधांची जाणीव होते व त्यामुळे तो आपल्या कौटुंबिक पार्श्वभूमीतून लेखनकृतीकडे पाहू लागतो.

''कितीतरी दिवसांनी गावाकडची आजी भेटलेली. तिच्यामागे वासरासारखी माझी लुडबुड चालू होती...... आजीच्या कुशीत डोके घुसळत माझे हसणे खुदखुदून बाहेर पडले, तशी आजीसुद्धा धाकुटलीची कड घेत म्हणाली, ''अगं भवाने, तू सुद्धा परवापर्यंत भातुकलीसाठी मोठ्यांना नाचवत होतीस सारखी. सदा आपलं भावलीचं कौतुक आणि भातुकलीचा घरभर पसारा...... आठव जरा स्वतःच खेळणं आणि मग हास तिला........''
(पृष्ठ क्र.१०९ - आठवणींतले आंगण)

हा प्रसंग वाचला की, वाचकाला स्वतःच्या नातेसंबंधाची जाणीव होऊन सोनेरी भूतकळात तो रमून जातो. त्याचे बालपण त्याच्या डोळ्यासमोरून तरळून जाते.

ग्रामसंस्कृती, लोकसाहित्य व व्यक्ति -व्यक्तिंमध्ये होणारे संवाद हे अरूणा ढेरे यांनी शहरी भाषेत जरी मांडलेले असले तरी, त्यातून ग्रामजीवनाच्या वातावरणाचा प्रत्यय येतो.

वाचकाला खिळवून ठेवण्याची क्षमता लेखिकेच्या वेगवेगळ्या प्रासंगिक वर्णनांत आहे. येथेच लेखिकेचे यशस्वीपण सिद्‌ध होते. प्रत्येक प्रसंग वाचताना वाचकाची जिज्ञासा चाळवली जाते.

#### ४.४ काव्यमयशैली

''काव्य, नाटक आणि कादंबरी या ललित वाङ्मयाच्या तीन प्रमुख शाखा आहेत. यापैकी काव्य हे छंदोमय असल्यामुळे त्याची भाषा गद्यापेक्षा साहजिकच वेगळी पडते. नाद हा छंदाचा आत्मा आहे. तेंव्हा छंदोमय वाणी ही नादयुक्त म्हणजे लालित्यपूर्ण असावी. हे स्वाभाविकच होय.''[१]

याप्रमाणेच लालित्याने ओथंबलेल्या काव्य चरणांचा आलेख अरूणा ढेरेंच्या लेखनातून उमटलेला आहे. काव्याची कमान ही वाचकाच्या मनात ताल, सूर, लय यांची उत्पत्ती करते. व वाचक हा प्रफुल्लीत होवून वाचनास प्रोत्साहित होतो व साहजिकच लेखिकेच्या लेखनावर प्रभावित होतो. आपुलकीने त्या साहित्याचा वाचक आस्वाद घेतो. लेखिकेच्या लेखनात आलेल्या काव्यपंक्ति ह्या नकळत जीवनाचा गाभा उलघडून दाखवणाऱ्या आहेत. त्यामुळे जीवनवादी दृष्टिकोण वाचकामध्ये निर्माण करण्याचे एक प्रबळ साधन म्हणून अरूणा ढेरेंच्या लेखनाकडे दृष्टी जाते.

#### ४.४.१ बालमनातील कविता :



* *''कुणी नाही गं कुणी नाही आम्हाला पाहत बाई.*

*शांती दाटली चहूकडे, या गं आता पुढे पुढे.''*

'मनातलं आभाळ' (पृष्ठ.१२)

हे तारकांचे गाणे लेखिका मनातल्या मनात म्हणत रहायची. मूळात लेखिकेचा पिंड हा कवयित्रिचाच आहे. काव्याची अपार ओढ लेखिकेच्या लेखनातून आपल्याला पदोपदी पहावयास मिळते.

* *''दिसावा दिशांच्या मधे देवतारा*
*असा हट्ट घेता लवे पापणी''*

'मनातलं आभाळ'(पृष्ठ.१२)

* *''अंगणात पडल्या पडल्या मेघांच्या रांगा दिसल्या*
*किती राक्षस,हत्ती घोडे बाल्यात कल्पना सरल्या*
*ते रम्य बालपण गेले, परिमेघ नभातच उरले,*
*जरी इथे न दिसली ताई, ते मेघ उरातच फुटले.''*

'मनातलं आभाळ' (पृष्ठ.१३)

* *''नव्या नवेल्या पालवीचा हा ऋतू......*
*मला आठवण येते तुमच्या देशाची......*
*फुगे तरंगत जातात हवेत, उंच.......*
*आभाळात खूप खूप उंच........''*

'मनातलं आभाळ' (पृष्ठ.१४)

**४.४.२ बोरकर, कुसुमाग्रज, ग्रेस, तांबे, खानोलकर व कोल्हटकरांच्या दिव्य अर्थ प्रकट करणाऱ्या कविता –**

* *''कोर बिलोरी तुझ्या कपाळी, शिरि मोत्यांची जाळी गं*
*तुझ्या लोचनी मुक्तात्म्यांची शाश्वत नित्य दिवाळी गं.''*

'मनातलं आभाळ' (पृष्ठ. १७)

* *''माझ्या मातीचे गायन*
*तुझ्या आकाश श्रुतींनी*
*जरा कानोसा देऊन*
*कधी ऐकशील का रे.''*

'मनातलं आभाळ' (पृष्ठ१७)

* *''गगनाच्या अंगणी, उमटते पाऊल शुभलक्षणी*
*नाजूक गोंडस असे कुणाचे, सांगा मजला कुणी*
*संध्यारागातुनी तयाचा तळ दिसतो साजणी*
*स्वर्गीसम रेषा दिसती कधी कधी त्यातुनी*
*पाऊल पडताक्षणी, जाहली तुटातूट पैंजणी*
*काही अस्ताव्यस्त विखुरले नक्षत्रांचे मणी.*
*उरले काही गुणी, तयांचा रुणझुण उठतो ध्वनी*
*कानी येतो अव्यक्ताच्या, तो अवकाशातुनी*

*गगनी एके क्षणी, दुज्या ते उठते क्षितिजातुनी*
*पाऊल दिसते परी तयांचा कोण असावा धनी ?''*

'मनातलं आभाळ' (पृष्ठ. १८)

* *''सारा अंधारच प्यावा*
*अशी लागावी तहान*
*एका साध्या सत्यासाठी*
*देता यावे पंचप्राण.''*

'मनातलं आभाळ' (पृष्ठ. २४)

* *''त्याचे गुणवंत सौभाग्य*
*आणि माझा दुर्मिळ धीटपणा. स्त्रीजातीमधला*
*ठाऊक आहे फक्त गोदावरीच्या पुराला*
*आणि पावसाळ्यातल्या त्या अर्ध्या रात्रीला.''*

'मनातलं आभाळ' (पृष्ठ. ४४)

* *''कशी काळ नागिणी सखे गं वैरिण झाली नदी*
*प्राण विसावा पैल तिरावरी, अफाट वाहे मधी.''*

'मनातलं आभाळ' (पृष्ठ. ४६)

* *''दिन, पक्ष, मास, ऋतु, वर्ष भराभर गेले*
*हे रक्त तसेच्या तसेच साकळलेले.''*

'मनातलं आभाळ' (पृष्ठ. ५६)

* *''ती अमर्यादता अचिंत्य गूढ दिशांची*
*ही अगाधता की सर्वंकष काळाची*
*हे दिसुन सर्वही, मज न दिसेसे होई*
*समजून मनाला, काही उमगत नाही.''*

'मनातलं आभाळ' (पृष्ठ. ५५)

* *''थेट ओसरीला येते,*
*वेडे सागराचे पाणी,*
*एका अंधारवेलीला*
*माझी लागतात गाणी.''*

'मनातलं आभाळ' (पृष्ठ. २३)

* *''बांगड्या बघा या !*
*श्रावण लावण्यराज लागला फुलाया !''*

'मनातलं आभाळ' (पृष्ठ. ३५)

* *''श्रावणमाझी, हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहीकडे !*
*क्षणात येते सरसर शिरवे, क्षणात फिरूनी ऊन पडे !''*

'मनातलं आभाळ' (पृष्ठ. ३९)

**४.४.३ संत कबीरांचे दोहे –**

* *''इब न रहू माटी के घर मै*
*इब में जाइ रहूँ मिली हरि मै''*

'मनातलं आभाळ' (पृष्ठ. ५६)

* *''दुलहिनी तोही पिया घर जाना*
*काहे रोवो, काहे गावो, काहे करत बहाना.''*

'मनातलं आभाळ' (पृष्ठ.५६)

* *''वे दिन कब आवेंगे माई !*
*जा कारन हम देह धरी हे,*
*मिलिबो अंग लगाई !''*

४.४.४ अक्क महादेवींची वचने



# संहारक वातावरणात संत स्त्रियांच्या सर्जनशील विचारांची गरज

## डॉ. अरूणा ढेरे यांचा आशावाद

▶ कोल्हापूर / प्रतिनिधी

ईश्वरप्राप्तीसाठी आणि पारमार्थिक साधनेसाठी समाजमनाविरूध्द पाऊल टाकणाऱ्या संत स्त्रिया या विलक्षण ताकदीच्या होत्या. आयुष्यभर समाजाकडून अपमान, अहवेलना सोसूनही त्यांनी जगाप्रती प्रेमाची भावना ठेवली. संतस्त्रियांचे जीवन हे सर्जनशील व नवनिर्मितीक्षम होते. आजच्या संहारकेंद्रीत जागतिक वातावरणात संत स्त्रियांच्या जीवनचरित्रातील हा विचार समाजाला दीपस्तंभासारखा प्रेरणादायी राहिल' असा आशावाद संत साहित्याच्या अभ्यासिका आणि ज्येष्ठ साहित्यिका डॉ. अरूणा ढेरे यांनी व्यक्त केला.

ब्राम्हण सभा करवीर मंगलधामच्यावतीने आयोजित 'कै. तात्यासाहेब तेंडुलकर स्मृती व्याख्यानमालेत' डॉ. ढेरे बोलत होत्या. 'संत स्त्रिया' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. गोकुळचे संचालक रवींद्र आपटे, महालक्ष्मी बँक संचालिका पद्मजा आपटे, सुचेता तेंडुलकर, मंगलधामचे अध्यक्ष राजाभाऊ जोशी व्यासपीठावर होते.

**तेंडुलकर स्मृती व्याख्यानमाला**

आपल्या तासाभराच्या व्याख्यानात डॉ. ढेरे यांनी वेदोपनिषद ते आठराव्या शतकापर्यंतच्या काळातील संत स्त्रियांच्या जीवनचरित्राची उत्कृष्ठरित्या गुंफण करत उपस्थित रसिकांना अध्यात्मिक आणि पारमार्थिक जगताची वेगळी अनुभुती दिली. प्रापंचिक आयुष्य जगतानाही प्रतिभा, आत्मज्ञान आणि आत्मसाक्षात्काराच्या बळावर या संत स्त्रियांना जे ज्ञान गवसलं ते त्यांनी आपल्यापुरतेच मर्यादित ठेवले नाही. अनुभवाची ती समृध्द शिदोरी त्या आयुष्यभर वाटत राहिल्या.

ढेरे पुढे म्हणाल्या, बारा ते अठरावे शतक या कालखंडात संपूर्ण देशभरात भक्तीचे खूप मोठं आंदोलन उभं राहिलं. ज्ञानप्रांतात खूप मोठे संत उदयास आलं. त्यांनी भक्तीच्या सागरातून ज्ञानगंगा शूद्र आणि स्त्रियांपर्यंत पोहचवली. संताचे बोट धरून पुढे संत स्त्रिया पारमार्थिक क्षेत्रात उभ्या राहिल्या.महत्वाचं म्हणजे या संत स्त्रिया स्त्रीजन्माविषयी उदासी बाळगणाऱ्या नव्हत्या. ज्या काळात स्त्रियांचे कार्यक्षेत्र 'चूल आणि मूल' इतक्यापुरते मर्यादित होते, शिकण्याचा, देववाणी अभ्यासणाचा अधिकार नव्हता अशा अंधार युगात त्यांनी परमात्माच्या वाटेवर पाऊल टाकत स्वत:बरोबर अनेकांचे जीवन प्रकाशमय बनविले.

संत स्त्रियांच्या वैशिष्ट्याविषयी सांगताना ढेरे म्हणाल्या, पंढरीच्या विठ्ठलात सर्व नाती पाहणारी जनाबाई, योगीराज चांगदेवला आयुष्याचं सारं सांगणारी चिमुकली मुक्ताई, जातीच्या पलीकडे जाऊन ईश्वरप्राप्ती होऊ शकते अशी विवेचना करणारी संत नामदेव महाराजांची पुतणी, राजवैभवाचा त्याग करणारी अक्कमहादेवी, संबंध मराठी साहित्यात अभंगातून आत्मचरित्र रेखाटणारी बहिणाबाई, पहिली मठाधिपती बनून गुरूपदेश करणारी संत वेणाबाई... या साऱ्या संत स्त्रियांचे जीवन हे विलक्षण होते.



कोल्हापूर : तात्यासाहेब तेंडुलकर स्मृति व्याख्यानमालेत बोलताना डॉ. अरूणा ढेरे.

दीपक भागवत यांनी प्रास्ताविक केले. मंगलधामच्या संचालिका सौ. कविता कडेकर यांनी महिला शाखेच्या कार्याची माहिती दिली. सौ.मीना जोशी यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. अध्यक्ष जोशी यांनी आभार मानले. शुक्रवारी सायंकाळी यशवंत पाठक यांच्या 'स्वामी समर्थ रामदास' या विषयावरील व्याख्यानाने व्याख्यानमालेचा समारोप होणार आहे.

* *''मिठू मिठू बोलणाऱ्या राव्या रे वेल्हाळा,*
*तुवा पाहिला का ?*
*कुहू कुहू सुस्वराने गाणाऱ्या कोकिळा,*
*तुज दिसला का ?*
*गुंजारव करणाऱ्या भटक्या भुंग्यांनो,*
*पाहिला का तुम्ही ?*
*तलावाच्या काठावर खेळत्या हंसांनो,*
*देखिला का तुम्ही ?*
*डोंगरात नाचणाऱ्या तुम्ही रे मोरांनो,*
*पाहिला का सांगा?*
*सांगा माझ्या चन्नमल्लिकार्जुनाला,*
*कुठे शोधु, सांगा.''*

'मनातलं आभाळ' (पृष्ठ. ६४)

* *''पर्वतशिखरी उभारिले घर, वन्यपशूंना भ्यावे का ?*
*सागरतीरी बांधियले घर, जळफेनाला भ्यावे का ?*
*भरबाजारी केले जर घर, गोंगाटाला भ्यावे का ?*
*जन्म घेतला या लोकी, तर स्तुति-निंदेला का भ्यावे ?*
*क्रोध नको, संताप नको, मग शांत रहाने हृदयाने*
*चन्नमल्लिकार्जुन देवाला नित्य स्मरावे हर्षाने.''*

'मनातलं आभाळ' (पृष्ठ. ६९)

### ४.४.५ महादेवी वर्मांच्या कविता –

* *''पर शेख नही होगी यह*
*मेरे प्राणोंकी क्रीडा*
*तुमको पीडामें ढूँढा*
*तुममें ढूँढुँगी पीडा । ''*

'मनातलं आभाळ' (पृष्ठ. ८६)

* *''निठुर क्यों फैला दिया यह उलझनोंका जाल,*
*आप अपनेको जहाँ सब ढूँढते बेहाल ?''*
* *''प्रिय चिरंतन मेरा सजनी,*
*क्षण क्षण नविन सुहागन मैं ।''*

'मनातलं आभाळ' (पृष्ठ. ८७)

* *''काल के प्याले में अभिनव*
*ढाल  जीवनका मधु आसव,*
*नाशके हिम अधरोंसे मौन*
*लगा देता है आकर कौन ?''*

**४.४.६ केळकरांच्या स्पष्ट कविता –**

* *''प्रतिभेचे निकर्तृत्वाचे आटून गेले सर्व झरे.*
*जुन्या स्मृतींचे गढूळ केवळ गुढगाभर जळ जिथे उरे.''*
'मनातलं आभाळ' (पृष्ठ. १०२)
* *''सोडून गेले पैलथडीला बरोबरीचे सर्व गडी.*
*रान राव्यापरि एकाकी मी घुमतो या ऐलथडी,''*
'मनातलं आभाळ'  (पृष्ठ. १०२)
* *''ही नवकविता गाजर गवताऐशी पसरे घन*
*करुनिया नापिक कवितावन,''*
'मनातलं आभाळ' (पृष्ठ. १०६)
* *''तुला वाटते ठसा उठविला आपण त्यावर शाश्वतसा*
*परंतु फिरता पाठ तुझी तो, पुनरपि निर्मळ जसा  तसा.''*
'मनातलं आभाळ' (पृष्ठ. १०६)
* *''मोहर वाऱ्यावर गळुंनी वा जळुनी तो जावो*
*वास मस्तकी परी निरंतर रसिकांच्या राहो.''*
'मनातलं आभाळ' (पृष्ठ. १०७)

**४.४.७ विश्ववर्णन – मुक्तेश्वरांचे**

* *''पृथ्वी खंड या शाळुंका । अनेकपर्वत शिवपिंडिका ।*
*इंद्र मांडिले अभिषेका । गगनपात्रीं बहु धारा ॥''*
'मनातलं आभाळ' (पृष्ठ. १८८)
* *''असो हे निशा दाटली काळी । जेवी काळ पुरुषाची कांबळी।*
*ब्रम्हांडदेवतेवरी सगळी । पांघुरविली. आप्तत्वें ॥''*
'मनातलं आभाळ' (पृष्ठ. १८९)
* *''रत्न झांकण समुद्री पडलें। ब्रम्हांड करंडा काजळ भरलें।*
*विश्वलोचनीं भरुनी उरलें। अपरिमित दश दिशा॥''*
'मनातलं आभाळ' (पृष्ठ. १८९)

### ४.४.८ संत रामदासांचे श्लोक

* *''मुके पणाचें बोलणें। हें जयाचें, तोच जाणे।*
*स्वानुभवाचिये खुणे। स्वानुभवीच पाहिजे॥''*

'मनातलं आभाळ' (पृष्ठ. २०२)

* *''बाह्यात्कार केला अधिक। परि तो अवघा लौकिक।*
*येथे पाहिजे मुख्य एका अंतर्निष्ठा॥''*

'मनातलं आभाळ' (पृष्ठ. २०३)

* *''आधीं अंतर हातीं घ्यावें । मग हळू हळू उकलावें।*
*नाना उपाये न्यावें।पर लोकासी॥''*

'मनातलं आभाळ' (पृष्ठ. २०३)

* *''येका जीवनें नाना रंग। उमटो लागती तरंग।*
*पालटाचा लागवेग। किती म्हणोनी पाहावा॥''*

'मनातलं आभाळ' (पृष्ठ. २०४)

### ४.४.९ लोकगीते – मराठी लोकगीतांतील स्त्रीदर्शन

* *'कंथ शेजारी उभारला, सून वलांडी उंबरा*
*सासू–सासरे म्हणती लक्ष्मी आली घरा ।*
*सासरी–म्हायेरी मैना माझी आवडली*
*धन्याची कोथिमीर, कशी गुणाला निवडली ।*
*अधिक–उणं न्हाई, सारी राखली मरजीनं*
*मन कंथाचं जीतलं गोड शब्दाच्या अरजीनं ।*
*सासर–म्हायेर, दोनी कुळांचं नाव केलं*
*घरच्या लक्ष्मीला घरदार लोभावलं ।*
* *सासूसासऱ्यानं पुण्य केलं पुण्यामधी*
*हात माझे लोण्यामधी । सकाळपारी ।*
*सासूसाऱ्याच्या शेतात रामकाठ्या*
*सून उतरते पाट्या । भरोभरी ।*
*दारावरी मी गं उभी आपुल्या तोऱ्यानं*
*मर्जी राखली दीरानं । सावळ्यानं ।*
*पाच गं उतरंडी पाचीला झाकण*
*मी गं नांदते भाग्यानं । सुवासिन ।*
* *सावळी सुरत, सावळ्या वाण्याची*
*माझ्या ग राजसा, कंठी गाठीव सोन्याची*
*तुझ्या जिवासाठी जीव माझा हाराहुरा*

*कशानं सुकलास शेतात राजगिऱ्या?*

* *ढवळा पवळा जी नंदी*
*मोटा जुंपिल्या दोनी*
*सोडा सोडा वो पानी*
*वरल्या बागाच्या कोनी*
*पिकल्या लिंबुन्या दोनी*
*पिकल्या लिंबुन्या दोनी*
*पिकलं लिंबू तोडीते*
*हिरवं लिंबू मी टाकीते*
*अशी माळीन नखऱ्याची*
*राणी शंकर शंभूची*
*सहज बसले गं न्हायाला*
*हार बाई ठेवलाय खुंटीला*
*घारीनं मारली झडप गं*
*चला सयांनो जाऊ या*
*नदीला धुनं धुऊया*
*धुताना हारवले मोती*
*तिकून आले शिरपती*
*का गं जमुना पारवती*
*काय सांगू तुम्हा हो पती*
*माजे हरवले मोती*
*माज्या मोत्याची निळा*
*चांद सूर्व्याची कळा*
*पतिदेव मला पावले गं*
*हार बाई माजे घावले गं*

* *सासूरवासामंदी गेली काकनं कोपऱ्याला*
*बयाबाई इच्चारते, काय जाचतं लेकराला?*

* *हसून खेळून गोड करते मनाला*
*केविलवाणे तोंड दिसू देईना जनाला*
*माझिया जिवाला मी आटिते पिटिते*
*पित्याच्या जीवासाठी नाव पाण्यात लोटिते*

* *रुणझुण पाखरा, जा माझ्या माहेरा*
*कमानी दरवाजा, त्यावर बैस जा*
*सांग माझ्या आईला ने मला माहेरा*

सांग माझ्या  बापाला ने मला माहेरा
सांग माझ्या भावाला ये मला न्यायाला
रूणझुण पाखरा, जा माझ्या माहेरा

* उड रे कागा पीवर जाय
उँची सी मैडी, लाल किवाडी,
अमवारो पेड झिलोल खाय । उड रे कागा
चौक बुहारत भावज मिलसी
आँगण बैठी मिलसी माय । उड रे कागा
पणिया भरती बहुया मिलसी
वीरो मिलसी झोका माय । उडरे कागा
गाडी ल्यावन्ता बाबा मिलसी
हुक्का पिवता दादो मिल्याय । उड रे कागा
अमवा पे बैठे बोल सुनाईये
सावण आयो, घीवड, बुलाय । उड रे कागा

* दिव्याला भरा तेल, घाला तेलात जोडवाती ।
वडील बहिणी गं गुज बोलू या साऱ्या राती ॥
देऊन देऊन नाही पुरत डोंगर ।
वडील बहिणी गं तुज्या बोलाचा आधार ॥

* ओटी भरा गं ओटी भरा, हिची ओटी भरा
हिरवा शालू हिरवी चोळी
कशी ही शोभे हिरवी राणी
हिरवा चौरंग हिला बसायला, हिला बसायला
हसू नका गं, गुपित सांगते
आज जरी ही एकली जाते
आणील संगे युवराजाला, हिच्या युवराजाला

* तान्ह्या ग राजापायी जीव होतो थोडा थोडा
लाडका बाळ माझा, माझ्या काळजाचा घडा

* एकुलती लेक, लेक जनमली शहाणी
दोन कुळांचं राखी पाणी
गुज हुरदीचं बोलाया मला कशाला हवी लोकं
माझी मला ही शाणी लेक

* वाघाच्या पोटीची मी त आहे गं वाघीण
बोलला कोण काही जाली देहाची आगीण
वाघाच्या पोटीची, मला वाघाचे कलम

*काय करू बाई माजा अस्तुरीचा ग जलम*

* *अगं तू फुलाई माळीणी, अगं तू फुलाई माळीणी*
*तुला गं राजा बोलावतो, तुला गं राजा बोलावतो*
*कशाला मला बोलावतो, कशाला मला बोलावतो?*
*तुज्यासाठी पैंजण घडवतो, तुला तो पैंजण घडवतो*
*जळो मेल्याचे पैंजण, जळो मेल्याचे पैंजण*
*माझा माळी बरवा गं, माझा माळीच बरवा गं*
*दंडी रूमाल हिरवा गं, दंडी रूमाल हिरवा गं*
*रूमालावरी न् काय काय परी, रूमालावरी न् काय काय परी*
*नागिन डुलते चाफ्यावरी, नागिन डुलते चाफ्यावरी*

* *गडण म्या बी केली, न्हाई आपल्या जातीची*
*जिवाला माज्या जड, आली मध्यानरातीची*
*गडन म्या बी केली, जनलोकात नसावी*
*दु:खाची वाटेकरी, माया अंतरी असावी*

* *रांधून घालते घरादाराला, पाहुण्याला*
*निवद मनोमन माज्या इठ्ठल देवायाला*

'आठवणींतले आंगण' (पृष्ठ. १२४-१३०)

## ४.५ लोकसंस्कृती -

दैनंदिन जीवनात घडणाऱ्या घटनांकडे सूक्ष्म पद्धतीने या लेखिकेने निरीक्षण करून लेखन केले आहे. त्यामुळे वाचकाला आपल्याच परिसराचे वर्णन केले आहे हा भाव जागृत होतो. आपल्या जीवनक्रमातील घटनांचा इतक्या सूक्ष्मरितीने अभ्यास केलेल्या लेखिकेच्या लेखनाकडे ग्रामीण वाचक आकर्षित नाही झाला तरच नवल!

### ४.५.१ ओव्या

#### ४.५.१.१ पावसाच्या ओव्या -

१) *'पाण्या गं पावसानं। हालले भले भले*
*मेघई रायानं। आस्मानीं डेरे दिले॥'*

'मनातलं आभाळ' (पृष्ठ.३०)

२) पाऊस नवरदेव। आभाळाचा केला डफ
याच्या करवल्या। इजा आल्यात लवत
झाडं झराडती। इजा कराडती.
आला आला म्हणती। धरणीबाई तुझा पती
नदीला आला पूर। नका जाऊ पाह्या
तिच्या गं शेजेवटी। आला गं मेघराया॥

'मनातलं आभाळ' (पृष्ठ.३०)

३) "पूर्णेला आला पूर। नका करू गाजावाजा
तिच्या शेजेवरी। वर्षभरी येतो राजा
नदीला आला पूर। पाणी उडे घोड्यावाणी
बोलली जमनामाई। स्थिर चाल माझ्यावाणी
नदीला आला पूर। नदी मारते उफाण्या
नदी मारते उफाण्या। सुल्पा सोडाव मोकळ्या॥"

४) पुर्णेच्या पुराच्या। तुझ्या कमानी
बाळाच्या सांगडीला। कडू भोपळा इमानी।

५) चाल झडाझडी। चाल तुही झराडणी
चइताचा महिना। इज कुठं कराडली

६) अवकाळी पाऊस। पडतो सपासपा
झाड हिवराचं। कवटाळून काय नका

७) पड पड पाण्या। पडून बरं केलं
कोण्या किरपणाच्या। पाणी पेवामंदी गेलं.

८) पाणी पडू पडू। डोंगर झाला वला
गाईच्या खुरात। पपया पाणी प्याला.

९) आरध्या गं राती। पपया राजा बोले
उठा उठा बाई। दिस पेरणीचे आले.

१०) चाड्यावर मूठ। ठेवली बहिणीच्या नावाची
ईस्वरानं दिली। रास पिवळ्या गव्हाची.

११) पाऊस पडतो। कोणीच्या कोणीकडं
दादाच्या गावाकडं। मोत्याचे शिरवड.

१२) पाण्या पावसानं। झड लावली कोकणी
पाण्या पावसानं। झड लावली डोंगरी.
अशात वली झाली। परशुरामाची घोंगडी.

१३) नदीला आला पूर। काही उतार होईना
गाडी गं बइलाशी। माझी कोंडली मईना.

१४) सांगून धाडते। मायबाई मंजुळाला
गुंतले जंजाळा। भेटून जाय मला
सांगून धाडते। कावळ्याच्या पंखोंपंखी
धाड गं मायबाई। हिरवी चोळी लाल नखी.

'मनातलं आभाळ' (पृष्ठ.३०,३१,३२,३३)

### ४.५.१.२ स्त्रीच्या जीवनाचे पदर उलघडणाऱ्या ओव्या –

१) राजबन्सी गं पाखरू। चोचीमंदी दुखावलं
मोत्या नि पवळ्याचा। चारा खानं इसरलं
उन्हाळ्याचं ऊन। झाडाला नाही पान.
जंगल पाखराचं। उदास झालं मन.
हासून खेळून। नार चालली बनाला
अंतरीचं दु:ख। काय कळे गवाराला
देहाला भिरूडं। सांगून काय सार
जगाला दिसतं । झाडं गं हिरवं गार
सुख माझं दु:ख। दोघं मांडले दुकानी
सुखाला मिळे धनी। दु:खाला नाही कोणी.

२) थोराच्या आम्ही लेकी । आम्ही फार शिरजोर
सर्पाचे केले दोर । वाघ नेले पाण्यावर
बोलशील बोल । बोलू देते एक दोन
तिसऱ्या बोलाला । उतरीन भारीपण

३) जोडीली मायबहीण । जात साळूची वायली
एका ताटात जेवायची । हौस मनात ऱ्हायली
तुझा माझा भाऊपणा । जसा डोंगरीचा झरा
वरी जमू द्या कचरा । अंतरात लोभ खरा

४) तुमच्या जिवापायी । व्हईन आगाशीऽऽची घार
तुम्हांवरी हेतू फाऽऽर । गं उड्या ॥

५) पिकलेलं लिंबू । लिंबू झाडाला तोलेना
गर्व झालेली बोलेना । वैनीबाई
शेजी गं पुसते । तुला भाऊ कोण कोण
चंद्र सूर्य दोघेजण । भाईराज

६) बापानं दिल्या लेकी । नाही पाहिलं वतन
कसाबाच्या दारी । गाई बांधल्या रतन ।
बाप म्हणे लेकी । तू गं नशिबाची हीन

डोंगर धुंडल्यानं । पळसाला पानं तीन ।
बाप म्हणे लेकी । मर मर वं पापिणी
तुज्या संसाराची । माज्या जिवाला घोकणी ।

७) दुबळ्या भ्रताराची । नको करूस हेळणा
वर्साला हलवितो । कोडकौतुक पाळणा ।
वळणाचा पाऊस । कुठं पडतो, कुठं न्हाई
भरताराचं सुख । दैवालागून हाय बाई ।
लेकीचा जन्म कसा । जसा बाभळीचा पाला
वाऱ्या वावटळानं गेला । धनी कुणाचा कोण झाला ।
भरताराचं झालं । सरगामंदी सोनं
मागं राहिली बाईल । तुळशीचं वाळवण ।

८) पीर्तीचा कंथ बोले । राणी गं खाली बैस
जातीस माह्यारा । मला कठीण जाती दिस

९) लेका गं परीस । लेक कशानं ती उणी
राजस बाळी माझी । हिरा नव्हे हिरकणी ॥
सगळ्या झाल्या लेकी । शेजी म्हणते झाल्या झाल्या
माऊली झुरे मनी । दाही दिशा चिमण्या गेल्या ।

१०) डोंगरी वणवा । आग लागली तणाला
जळती किडा मुंगी । शान्या उमज मनाला ॥
आपल्या मनाजोगं । मन गेले मी पहाया
सोन्याच्या नादानं । खरं रेशीम गेलं वाया ।
संसाराचा वेढा । वेडाबाई वंगाळ
पान्यातली नाव । खुषीखुषीनं सांभाळ ॥

'आठवणींतले आंगण' (पृष्ठ. २८-३८)

### ४.५.१.३ पतीच्या आमरणाविषयी ओवीगीते –

१) अहेवाचं लेनं ऽ हात भरून काकनं
हळदीवरी कुकूऽ कपाळी दिसं छान
धनसंपदेचं ऽ नको देवाला घालू कोडं
हळदकुकवाचं राज असावं तेवढं

२) शेजी लेती लेनं, पाच पुतळ्या कवामवां
कपाळीचं कुकू नित दागिना माझा नवा
एका करंड्याचं कुकू रोज लेत्यात सासूसुना
सये गं शेजीबाई, असं भाग्य न्हाई कुना

सुर्व्या उगवलाऽ उगवला झाडावेरी
किरन टाकीतो, तेच माझ्या चुड्यावरी

३) अहेव मरनाची मला हाये वो आवड
म्होरं पतीपुत्र, मागं कुकवाची कावड

४) अहेव मनणाची सयांनु मोठी मौज
म्होरं चाले कंथ, मागं गोताची चाले फौज

५) फाटला पाटव, घेत निरीला झाकून
आब कंथाचा राखून
दुबळा भरतार, असू दे दुबळा बाई
सम्रत मायबाप, तिथे काडीची सत्ता न्हाई

६) अहेव मरण येवं असलपनात
ध्याईला जागा तुळशीवनात

७) सरगाच्या वाटे हळदकुंकवाचा सडा झाला
अहेव नारीचा गाडा गेला
अहेव मरण अंगणाला देई शोभा
शेजेकडेला कंथ उभा
अहेव मरण सोमवारी रातीयेचं
पानी कंथाच्या हातीयेचं
अहेव मरण किती करू मी वाखाणणी
कुंकू चमके सूर्यावाणी
माहा जीव गेला जवळ नाही कोणी
पाचा पदराची येणी उकलतो घरधनी

८) अयेव मरण हिरवी साडी नि हिरवा चुडा
कंथ रडतो घडाघडा

९) अहेव मरन भाग्याच्या नारी तुला
सोन्यारूप्याची फुले कंथ उधळीत गेला.

१०) गेला माहा जीव । लेक रडे सारी रात
जरीचा पदर । भिजला सवा हात
गेला माहा जीव । नवस झाला पुरा
हिरा पाजे पाणी । हिरकणी घाली वारा

११) तोंडामंदी तोंड । तोंड टाकते चिमणी
पाठीचा बाळराजा । घेता पतंग घेरणी
माह्या गं सरणावरी । कावळ्याच्या लटपटी
बाळा हा पाजे पाणी । मैना गं सांगे गोठी

१२) *माहा दशा पिंडा । कावळ्याला मुभा*
*बाळराजा माहा । थंड पाण्यामध्ये उभा*

१३) *अहेव मरण यावं पित्याच्या दारापुढे*
*बंधूला सांगावं सरलं माह्यार तुझ्याकडे*
*अहेव मरणाची चिता जळे साउलीला*
*लेकीच्या मरणाचं दुःख आगळं माउलीला*

१४) *गेला माहा जीव, बापाजीच्या मांडीवर*
*रडते माय बाई, शेला देते तोंडावर*
*माह्या गं सर्णाविरी, उगवला सोनचाफा*
*सरती बोळवण, तुम्ही करा मायबापा*
*माह्या गं सर्णाभोती, कोण हिंडे येड्यावाणी*
*दादा गाळीतो आसू, धाई धाई क्षणोक्षणी*

१५) *अहेव मरण, तिला पिवळं सरण*
*भ्रताराच्या आधी डाव जितला गोरीनं*
*अहेव मरण, नारीचं झालं सोनं*
*चुड्या नि कुंकवाचं ल्यायलं तिनं लेनं*

'आठवणींतले आंगण' (पृष्ठ. १३१-१३९)

## ४.५.२ लोककथागीते –

### ४.५.२.१ चंद्रावळ आणि राहीचे लोककथागीत –

*लक्षपती गवळी एक*
*त्येला दोघीजनी लेकी*
*या लेकींची नाव कायी*
*ऱ्हाई चंद्रावळी बाई*
*ऱ्हाई दिली गोविंदाला*
*चंद्रावळी गवळ्याघरी*

* *या गं गवळणबाईनं*
*केला दहियाचा साठा*
*चांदीचा गं रवी-दोर*
*सोन्याचा गं हारा-डेरा*

* *नेसली पिवळी पितांबर*
*अंगी मधुपका चोळी*
*नाकी सुरव्याची नथ*
*नेत्री काजळ भरीयेलं*

भांग भरला गुलाली
शिरी मोत्यांची चुंबळ
घेतला दह्याचा माठ
पायी जोडव्याचा थाट
निघाली मथुरा बाजारी
* बाजाराची लोकं बोलं
सुंद्रा कामिन कोनाची
गोविंद म्हेवनी तुमायाची
गोविंदा तेथून निगाला
गेला आपल्या वाड्याला
अंग अगं न्हाई राणी
आपली भैण तू आनावी
घरी-दारी लगीन न्हाई
चंद्रावळ माझी कवळी
तुमचं मन न्हाई निर्मळ
गोविंदा तेथून निगाला
गेला आपल्या माडीला
* गोविंदा तिथून निगाला
गेला आपल्या माडीला
अंतर मंतर झोकीयीतो
पिवळं जुंदळे फेकीयीतो
येरं येरं कवड्या नागा
येरं येरं बच्च्या नागा
माजा मैतर हुशील गा
डव्हात जाऊन बसशील गा
* या गं गवळणी बाईच्या
दासी पाणीयाला गेल्या
नाग घागरी भरीयेला
आणून रांजणी वतीला
* या गं गवळणी बाईनं
घेतली सोनियाची झारी
ती गं रांजणी बुडविली
नागां करंगळी दंशिली
गवळण मूर्च्छना पडली

*	या गं गवळण बाईची
सासू भाईरनं आली
अगं अगं तू सून लेकी
त्वांड धुया पानी न्हाई
गवळण शिणली भागली
या गं गवळण बाईच्या
सासरा कुनीकून आला
अगं अगं सून लेकी
आंघूळीला पानी न्हाई
गवळण उगीच निजली
या गं गवळण बाईचा
दीर भाईरनं आला
*	अगं अगं वैनीबाई
धारंला चरवी कशी न्हाई
गवळण शिणली भागली
गवळण उगीच निजली
*	सासूनं रोजना मांडिली
बरी हू गं गौरीमाता
घराची वो शोभिवंता
दिरानं रोजना मांडिली
वैनी न्हवं ती गवळणी
कधी न्हाई मोडिलं
आमचं कसलं बोलणं
*	एवढा गलबला ऐकला
हरी भाईरून आला
कावो देया येनं केलं
चंद्रावळी पान लागलं
*	अंग अगं न्हाईराणी
चंद्रावळी पान लागलं
न्हाईराणी रडू लागली
कुरळं क्यास तोडीलं
ऊर दणदणा झोडीलं
गोविंदा लई रागेला
गेला आपल्या माडीला

* *गेला आपल्या माडीला*
*अंतर मंतर जोकीला*
*पिवळं जुंदळं फेकीलं*
*येरं येरं कवड्या नागा*
*येरं येरं बच्च्या नागा*
*माजा मैतर तू हुशील*
*वीख पिऊनी घेशील*

* *आळवण बोळवण करूनी*
*सा सा म्हइनं रात्र गेली*
*चंद्रावळ राजाची राणी झाली*

'आठवणींतले आंगण' (पृष्ठ. ४१-४८)

### ४.५.२.२ कुणब्याचे लोककथागीत –

* *नमिला रे*
*गजवदन सखा म्यां नमिला रे*
*मूळारंभीं, नानारंभीं*
*नाचत रंगणिं आजिला रे*

* *शंकरासी पुसे पार्वती*
*कुणबी भूमीचा अधिकारी*
*असे असता का हो शंभरा*
*सदा गरिबी कुणब्याच्या घरी?*

* *शंकर म्हणे ऐक पार्वती*
*त्याची वासना नाही बरी*
*त्याची प्रचीती तुला दावितो*
*चल जाऊ कुणब्याच्या घरी*

* *शंकराने – महादेवाने*
*नंदीवरती केली स्वारी*
*मृत्युलोकी चालून आले,*
*तिथं कुणब्याची नगरी*
*त्या कुणब्यानं शेतामध्ये*
*पेरली होती पहा ज्वारी,*
*कुणबी हरकला, आनंद झाला,*
*माळ्यावर बसुन मारतो ललकारी*

* *पार्वतीला ठेवुन झाडाखाली*

शिवशंकर जोगी बनला
'अल्लख' गाजवीत कुणब्याच्या
शेतावरती चालुन गेला
कुणबी बोलू लागला,
जोगड्या, तू कोणीकुन आला?
हुर्डा ठेवला का तुझ्या बापानं
रस्ता मुकाट्यानं धर आपला
* शंकराने – महादेवाने
विचार पहा कैसा केला
पाच कणसं हुर्ड्याची मोडली
तो कुणबी धावत आला.
* कुणबी बोलू लागला, जोगड्या
का केलीस माझी चोरी?
माळ्याखाली देव बांधिला
गोफणिची घेउन दोरी
* दोन प्रहर अंमल झाला,
शिदोरी घेउन आली कुणब्याची बाईल
माळ्याखाली देव बांधिला
पाहुन करती नवऽऽल
आपल्या भ्रतारासी बोलु लागली
तुम्ही बरं नाही केलं
असा हा साधुसंतांचा छळ करता
वंश आपला बुडंऽऽल
* आपल्या हातानं सोडून दिले
पळू लागले भगवान
पळता पळता त्यांना ओळखले
इकडे पहा त्या पार्वतीनं
* पार्वती म्हणे, अहो शंकरा
कुणी तुम्हाला गुंतविलं!
काय सांगू तुला पार्वती
खूप कुणब्यानं झोडपलं
* पार्वतीला राग आला
शिपाई बनली सरदार
नंदीचा तो करून घोडा

होऊन त्यावरती स्वार
शेताभवती घोडा फिरवी
'ये' म्हणे 'कुणब्या बाहेर'
कुणब्याचा हात धरूनशानी
चाबुक ओढले दोन–चार
* कुणबी रडतो, पाया पडतो
शिपाईदादा, पुरे कर
देतो खायाला कवळा हुर्डा
बसून खावा पोटभर
घागर पाण्याची, मोट कणसांची
घेऊन येतो बरोबर,
पार्वतीचा घोडा चालला
कुणबी पळतो त्याच्या म्होरं
* पळता पळता त्याला वळखी
इकडे पहा तो शंकर
काय सांगू तुला पार्वती
हाच मघाचा तस्कर!
* पार्वतीला राग आला
शाप दिला सत्वर
'अस्सल माल दे जा उदम्याला
तू खा कोंडा–मातेरं
पार्वती म्हणे, ऐक कुणब्या
दानधर्म हातानं कर'
म्हणे शिवनाथ, शिवपार्वती
निघून गेली कैलासावर
* धरा या रांडंच्या झिपरीला
अन् बांधून घाला समोरच्या खांबाला
* फुटकी जांगटी
मोडकी परडी
खांद्यावरती चौरी
घेऊन निघाली माळ्याच्या मळ्याला
माळ्याच्या गुंफेत उदेकार जागला.
* माळी लोळत लोळत आला
चरण धरायला

*माझी यल्लारी करतो तुझी भक्ती*
*आलो शरण धरतो चरणागती*

* *आदिमाया शक्ती रेणुकेच्या पोटातला गर्व केला.*
*बेलभंडार शिवला*
*शिरी हात ठेवला.*

'आठवणींतले आंगण' (पृष्ठ. ४९-५७)

### ४.५.२.३ नवलाखी हाराचे गाणे. –

* *सूर्याची कन्या राधिका*
*बत्तीस लक्षणी देवता*
*उठली कोंब्या फटफटी*
*पेटीवल्या चंदनवाती*
*केला केरनिवारा*
*गेली गाईच्या गोठ्याला*
*आनलं गोळाभर शेण*
*केलं सडा सारवन*
*घातली कणी रांगू यिळी*
*घेतली तांब्या घागयीर*

* *घेतली मोतिया चुंबळ*
*घेतली गजयीनी चोळी*
*घेतला पिवळा पितांबर*
*राधिका नेसून निघाली.*

* *गेली यमुनेच्या तीरी*
*उतरली तांब्या घागयीर*
*ठेवली मोतिया चुंबळ*
*ठेवली गजयीनी चोळी*
*ठेवला पिवळा पितांबर*
*घातला गळ्याखाली हात*
*काढला नवलाखी हार*
*ठेवला कलम वृक्षावर*

* *राधानं आंगूयीळ केली*
*कपाळी कुंकू लावीयिलं*
*सूर्व्या नमस्कार केला*
*नेसली पिवळा पितांबर*

घातली गजयिनी चुंबळ
घेतली तांब्या घागयीर
लागली राजस मारगी
* आली घराजवयिळी
ओतली घागर घंगाळी
लावली माळ्यायाला शिडी
काढले चंदनी सलपे
पेटिवल्या तांब्या वैलचुली
काढले साळी तांदूयीळ
* घंगाळी आदणी वरीयेले
मुगाचे वरण करीयेले
केली वांग्याची शाक
राधानं सैपाक बा केला.
* राधानं सैपाक बा केला
वाढला सासू सासऱ्याला
वाढला दीर दाजिबाला
वाढला आपुल्या भरतारा
वाढला नणंद साजणीला
* सासुरवाशिणी लेकी निगाल्या उनाच्या
आईबापामागं भाऊभावजया कुणाच्या
* सासूबाई नको, नको पाहू रागेजून
लावती कलागत नंद नव्हं ती वैरीण
* केलं आपुलं बा ताट
राधिका जेवाया बैसली
राधाला अपसकुन बा झाला
पैला घास धरणीला
दुसरा घास गळी आला
घातला गळ्याखाली हात
न्हाई नवलाखी हार
राधिका मनात चरकली.
* गेली यमुनेच्या तिरी
बोलली कलम रूक्षायाला
माझा नवलाखी हार
कुठं वो गेला सांगा दादा

कलमावरचा गरूयीड
त्यो का बोलू लागयीला
तुजा नवलाखी हार
न्हेला गवळ्या गोइंदानं
* तिथून राधिका निघाली
गेली गवळवाड्यायाला
आरं तू गवळ्याच्या गोइंदा
दे माजा नवलाखी हार
नवलाखी हार दिल्यावर
काय गं राधे देशीयील?
दीन मी सुपाऱ्या पाचुंदा
दीन मी पाच नारळ
आमी तर मथुरेचं वाणी
आमा नारळ सुपारीचं काय
* आली धावत पळत
आली अपुल्या वाड्यायाला
घेतली दंडा पुरचुंडी
गेली वाण्यायाच्या आळी
आवो तुमी वाणीदादा
माजा दादा हुशील का?
मला गुल्लाल देशील कां?
माजा दादा हुशील का?
* राधिका धावत पळत
गेली लालनी बागेत
तिथं गवळ्याच्या गोइंदा
निजंनं सुर्म जाला व्हता
आरं आरं तू गोइंदा
जागं व्हावं झडकरी
साकरंचं पोतं सई
फेकीलं मी अंगावरी
जागं व्हा, जागं व्हा वो
मुकुंद आवो मुरारी
* घातला उशीखाली हात
घेतला नवलाखी हार

*तितनं धावत पळत*
*आली आपुल्या वाड्याला*

* *किष्ण सये जागा झाला*
*गडबडून उठीयेला*
*वारं तरी सुटूनी का*
*आंबा तरी पडूनी का*
*मग मी जागा झालो असतो*
*जाग तं मला आणि असती*
*विडा तं मी मग खाल्ला असता,*
*हार मग मी दिला असता*
*रंग तरी खेळलो असतो*
*हार मग मी दिला असता*

'आठवणींतले आंगण' (पृष्ठ. ६२-६९)

### ४.५.३ लावणी -

* *वर उंच माडीवर*
*चौथ्या मजल्यावरऽ*

* *''हरी वाजवितो बासरी गं*
*तान्हा बाळ विनंत्या करीऽ''*

* *हलवित झोका गेला लांब*
*लांब लांब लांब, अरे कृष्णाऽ जरा थांब*

* *''कान्हा मुखसे ना बोले*
*बाजुबंद खोले-''*

* *जाई झोक सांभाळी तोल*
*सखे गं आडाचं पाणी लई खोल*

* *हले चालताना बाळीचा झुबा झुबा*
*पुढे रस्त्यात मैतर उभा उभा*

* *शहर बडोदे सोडुनि दिधले,*
*वर्ष झाली बारा*
*माझा सखा कुणीकडे गेला गं*
*बाई गंऽ, बाई गं*

* *जिसका नकाब शबाब था*
*आहा रे दौरे-ए-जिंदगी*

* *साची कहो मोसे बतिया पिया*
  *कहाँ गवायी सारी रतियाऽ*
* *'चल बोल सुंदरी बोल*
  *आता तरी व्हय म्हणशील का?'*
* *पोलिस पाटलाचं माजं कूळ*
  *तू पायाची पायधूळ*
  *तुझ्यासारख्या पोरी*
  *लाख येतील घरीं*
* *'तुमचे झाले सैंवर,*
  *आम्हा आले गहिवर,*
  *कसे पडले दहिवर*
  *कसा फुटला गहू गं हरबरा,*
  *बाळपणाच्या नाना तऱ्हा'*
* *'अहा देश कैसा छान,*
  *कसं हिरवं हिरवं रान,*
  *कवळं नागवेली पान*
  *माझं हरपलं भान,*
  *महाराष्ट्र देश सुंदरा,*
  *सोनेरी गुढी मंदिरा'*
* *पंचवीस दादुले हाती म्या धरूनि उठविले*
  *अंतर्गृह सावलीत येऊनि निश्चल बैसले*
  *एका जनार्दनी एकी एकपण मुरले*
  *जन्म जरा मरण हरले*
  *कोल्हाटिण झाले, बाई मी कोल्हाटिण झाले ॥*

'आठवणींतले आंगण' (पृष्ठ. ७१-७९)

### ४.५.४ जागरण –

* *तुळजापूरच्या भवानी आई, गोंधळा ये*
  *माहुरच्या रेणुकाई, गोंधळा ये*
* *नळदुर्गाचे मल्हारी, जागरणाला यावे*
  *तुळजापुरचे भवानी, जागरणाला यावे*
* *रांजणगावी गणपती रे – रंगणा यावे*
  *चिंचवडी मोरया रे – रंगणा यावे*
* *दैत्यासाठी खंडेरायांनी धरला अवतार ।*

*दैत्य मर्दुनी ठार केले, धन्य तू मैलार ।*
*आसक्तीनं असूर पेऊन तू लिंगाकार काढून ।*
*अंगाची ज्योत, भस्म केले भंडाराची ।*
*पहा रोकडी प्रचीती मल्हारी देवाची ।*

* *युद्धास राहिले उभे देव मल्हार ।*
*केला दैत्यावर हल्ला, मार अनिवार ।*
*केली येकचि गर्दी, झाला बेजार ।*
*मारला हात, पाहुन उडवले शीर ।*

* *मी हो लग्नाची अस्तुरी म्हाळसा ग राणी*
*कसा काय झाला अन्याय सांगा मज कोणी ।*

* *सेज केली महाली जी लाविल्या समया सात*
*अरे हो, वाट पाहिली साऱ्या रात्री जी...*

* *बानू करूनिया ग थाट, शिरी ग दुधाचे भरूनि माठ जी*
*जात होती बाजाराची वाट, पडली देवाची गाठ जी ॥*

* *मौजा केल्या रे बहुप्रीतीनं । कुठे नाही पडलं उणं रे*
*एकाएकी झालास रे बैमान । फार मन केले कठीण रे*

* *तू मोहनी रूप धरसी । ऐक बानाई जी*
*कपट करूनी मानसी । ऐक बानाई जी*
*फसविले माझ्या देवासी । ऐक बानाई जी*

'आठवर्णीतले आंगण' (पृष्ठ. ८६–८९)

### ४.५.५ दशावतार –

* *जें मूळस्वरूप तुझें । जेथौनि इयें द्विभुजें चुर्तर्भुजें ।*
*सोआंगें सुरकार्याचेनि व्याजें । घेओ घेओ येसि ॥*
*जळसेनाचिया गवसणिया । मछ कूर्मु इया मिरवाणियां ।*
*खेळु सरलेयां तुं गुणियां । सांटविसि जेथें ॥*
*ऐसें जें अगाध तुझें । विश्वरूप कानीं आईकिजे ।*
*तें देखावचा चित्त माझें । उताविळ देवा ॥*

(ज्ञा. ११.८३, ८४, ८५)

* *सोंग संपादितां तोखलेपणें । नटासि दीजेति वस्त्रें भूषणें ।*
*तो सोंग लटिका, परी तीं भूषणें । नटासिची अर्पिती ।*
*तैसें किरू माइक अवतरण । तेथ कीजे जें भजन ।*
*तें होय समर्पण । जगदीश्वरीं ॥*

(विवेकसिंधू, ५.१८,२१)

* *कां ते नटाची सोंग संपादणी । की बहुरूपीची रावो राणी ।*
*कीं ते बाजीगारी जैसी साचपणीं । तैसी ब्रह्मीं मूळ माया ॥*

(स्वानुभवदिनकर, १३.२.१००)

* *बहुरूपी रूपें नटला नारायण । सोंग संपादून जैसा तैसा ।*

(तु.गाथा २५०१)

* *धरियेलीं सोंगें । जेणें अवघीं पांडुरंगे ।*

(तु.गाथा १०१४/१-२)

* *गोपाळकाल्याचा विन्यास । रासक्रीडेचा हव्यास ।*
*गोपाळवेषाचा विलास । मनोहर वेषें पावावा ॥*
*वानावी देवांची वाढीव । करावी देवांची भाटीव ।*
*ऐसे दावुनी हावभाव । महोत्सव करावा ॥*

* *शंभु म्हणताए मुरारी । तुं व्यापकु सचराचरीं ।*
*धरूणि मावेची जमनिक । कैसा खेळसी सूत्रधारी ॥*
*तुं अवत्रलासि दाहाही वेष । तुं बहुरूपी परमपुरुष ।*
*तुं सर्वव्यापकु । तुवां भुवीले तिन्ही लोक ॥*

(उखाहरण, २०३७, २०४३)

* *'येकु बहुरूपी केली शक्ती । नाना स्वांगीं नाचविती ।'*

* *खेळतां नेटके दशावतारी । तेथें येती सुंदर नारी ।*
*नेत्र मोडिती कळाकुसरी । परंतु अवघे धटिंगण ॥*

* *तो गजराज नमीलां । नटारंभी खेळतु देखिला ।*
*नाना रूपें नटला । मायावेषें ।*

* *सुलक्षणीक सुंदर । रूप नटलें मनोहर ।*
*ऐसे अनंत अवतार । पालटु दावी ॥*
*जे सोंग ये सृष्टीरंगणीं । ते करी संपादणी ।*
*निज भक्त देती वोवाळणी । जीवज्योतिरत्नें ॥*

(बाळक्रीडा १.२-७)

'आठवणींतले आंगण' (पृष्ठ. ९५-९७)

### ४.५.६ चित्रकथी –

* *वर्णकैः सह यो वक्ति स चित्रकथको वरः ।*
*गायका यत्र गायन्ति विना तालैर्मनोहरम् ॥*

'आठवणींतले आंगण' (पृष्ठ. १०७)

## ४.५.७ बाहुल्या : नाट्याची गंगोत्री –

* *तो आल्यागेल्याचा पाहुणचार*
*दुखण्याखुपण्यावरील ते वैद्याचे उपचार*
*बाळाला न्हाऊ घालणं आणि*
*बाहुलीला दागिन्यांनी मढविणे....*
*मांडलेली भातुकली अशी रंगते ... अशी रंगते*
*आणि केव्हा एकदा पेटाऱ्यात मिटून जाते.*

'आठवणींतले आंगण' (पृष्ठ. ११३)

## ४.५.८ लोकसाहित्यातील दैवते –

* *गूळपोळी, तूपसाखर, भातावर सार ।*
*गणती नाही भाजीतरकारीला*
*बुंद्या, कुरवड्या पापडाला ॥*

* *सातव्या पंगतीला । रूक्मिण वाढते शेंगभेंडी*
*पंचामृत लावा तोंडीं ॥*

* *सांजा हा तुज आवडे । बटाट्याचे केले वडे*
*तोंडी लावी ये घिरडे । हट्ट का आला, सांग तू मला*

* *पंढरपुरामंदी हैत्या माळणी रमाउमा ।*
*देव राजस विठुलाला फुलांचा पायजमा*

* *पांडुरंग म्हणे, दे गं रूक्मिणी धोतर ।*
*दिंडी आली ज्ञानोबाची, त्याला जातो मी सामोर ॥*

* *गिरिजाबाईची साडी चिंचोळ्या येलांची*
*नक्षी शंभूनं गुंफिली जाईजुईच्या फुलांची*

* *रूख्माईला साडीचोळी, सत्यभामेला दोरवा*
*विठ्ठल देवायला तुळशीबाईचा गारवा*

* *शेर शेर सोनियाच्या रखुमाईच्या पाटल्या ।*
*देवा रे इट्ठलाच्या किती मोहरा आटल्या ॥*

* *रूख्माईची चोळी टाका पडतो लांब लांब ।*
*नामदेव शिंपी सये रेखी गरूडखांब ॥*

* *तुळशी गं बाई तुला नाही नाक डोळे ।*
*अशा सावळ्या रूपाला कसे गोविंद भाळले ?*

* *या बाई जेजुरी नगरात, कोऱ्या चंदन महालात*
*म्हाळसा–बाजाई भांडती । ऐकून मल्हारी हासती*

* *देव जेवत्यात, लाडू ठेविती शेल्याआड ।*
*रुखुमाई बोले 'देवा, जनीचं किती येड ।'*

'आठवणींतले आंगण' (पृष्ठ. ११८-१२१)

## ४.५.९ पुराण आणि कीर्तन : एक अनुबंध –

* *यामिमां पुष्पितां वाचं प्रवदन्त्यविपश्चित : ।*
*वेदवादरताः पार्थ नान्यदस्तीति वादिनः ॥*

* *तीर्थ अथवा पुराण । वेधक जनसभा पाहोन ।*
*येक सांगती पुराण । तेंचि कैसें?*

* *मृदांगु येकु वांचूनि । आणि टाळू, वीणा तये स्थानी ।*
*उपांग आणि श्रुति दोन्ही । लाविलिया तात्काळ ॥*
*मग ते पाहोनी सुवेळा । क्रमेंचि आलापु केला ।*
*तदंगन्यासकला । संपादी कुशलत्वें ॥*

* *प्रसंगु असे युद्धाचा । तरी आवेशु वीराचा ।*
*रोषावेषु तेथींचा । संपादून दावि ॥*

* *तार मंदिर (मंद्र) घोषेंकरुन ।*
*वरि स्वराचें माधुर्यपण ।*
*हावभावें लोकरंजन ।*

* *ऐसा रसिक बोल बोले ! सर्वांगें आपणु डोले ।*
*प्रेमाश्रु आणि कांटाळे । विषयस्फूर्ति ॥*

* *ऐसें हसोनि हसविणें । रडोनि जन रडविणें ।*
*नाना प्रकारीं मोहणें । ऐसिया प्रवर्तला ॥*
*देखोनि अंगचारातें । येक ते लोधले तेथें ।*
*येक मनोरम वाचेतें । गुंपले लोक ॥*
*येक रागरचना पाहती । येक नादक्षुब्ध होती ।*
*येक अर्थाचा ठायीं रमती । निर्मळ मनें ॥*
*अर्थचाड श्रोतेयां थोडी । परंतु शब्दीं रुपीं त्याची आवडी ।*
*च्यार प्रहर ते घडी । येकी होय ॥*

* *अनुसंधान रामायण । लावी, यालागी त्याकारणे ।*
*बाळकृष्ण रामायणे । विश्व म्हणे तयाप्रती ॥*

* *कीर्तनाचे ठायीं प्रेमा । कीर्तनाचा वर्णी महिमा ।*
*स्वयें कीर्तन करितां नामा । श्रीरामाच्या गात असे ॥*

* *स्वयें करितां कीर्तना आपण । निजदेहाचें नसे स्मरण ।*
*माघें अमदाबादी दोन वीणे । वाजती, तेणें नाद भरे ॥*

* नसे टाळ वा मृदंग । परि कीर्तनाचा अद्‌भुत रंग ।
श्रीरामकथेचा प्रसंग । आणि अव्यंग भक्ती त्यांची ॥
* आधिं करूनि पूर्वपीठिका । मग लावी रामकथानका ।
ओवीबद्ध असे टीका । जी का येका जनार्दनीं केली ती ॥
अध्यायाची होय समाप्ती । तोवरी कीर्तन करिती ।
मध्यंतरीं न सोडिती । म्हणवून प्रीती जनांची ॥
* प्रल्हादस्तालधारी तरलगतितया चोद्धवः कांस्यधारी
वीणाधारी सुरर्षि : स्वरकुशलतया रागकर्तार्जुनोऽभूत् ।
इन्द्रो वादिन्मृद्ङ्गं जयजयसुकरा : कीर्तने ते कुमारा :
यत्राग्रे भाववक्ता सरसरचनया व्यासपुत्रा बभूव ॥
* आसनं समधिष्ठाय यत् पुस्तकपुरःसरम् ।
भगवच्चरिताख्यानं स वै वैयासिको मतः ॥
* वीणादिवाद्यसंगीतसाहित्यसमलंकृतम् ॥
संकीर्तनं समुत्थाय नारदीयः स कीर्तितः ॥

'आठवणींतले आंगण' (पृष्ठ. १४१–१४९)

## ४.५.१० दासबोधातील कीर्तनविचार –

* सगुण मूर्तीपुढे भावें । करूणाकीर्तन करावें ।
* करूणाकीर्तनाच्या लोटें । कथा करावी घडघडाटें ।
श्रोतयांचीं श्रवणपुटें । आनंदें भरावीं ॥
* देवाचें वर्णावें वैभव । नाना प्रकारें महत्व ।
सगुणीं ठेवूनिया भाव । हरिकथा करावी ॥
* भक्तिज्ञान वैराग्य लक्षण । नीतिन्यायस्वधर्मरक्षण ।
साधनमार्ग अध्यात्मनिरूपण । प्रांजळ बोलावें ॥
* सगुणकथा या नाव कीर्तन । अद्वैत म्हणिजे निरूपण ।
सगुण रक्षून निर्गुण । बोलत जावें ॥
* प्रसंगें हरिकथा करावी । सगुणीं सगुणकीर्ती धरावी ।
निर्गुणप्रसंगें वाढवावी । अध्यात्मविद्या ॥
* कथा रचायाची खूण । सगुणीं जाणावें निर्गुण ।
न बोलावे दोष गुण । पुढिलांचे कदा ॥
* निर्गुण नेलें संदेहानें । सगुण नेलें ब्रह्मज्ञानें ।
दोहोकडे अभिमानें । बोस केलें ॥
* कीर्तन ऐकतां संदेह पडे । सत्य समाधान तें उडे ।
नीतिन्याय साधन मोडे । ऐसें न बोलावें ॥

*	*ब्राह्मण्य रक्षावें आदरें । उपासनेचीं भजनद्वारें ।*
*गुरुपरंपरा निर्धारिं । चळोंचि नेदावी ॥*
*नाना नवरस शृंघारिक । गद्यपद्याचें कौतुक ।*
*नाना वचनें प्रास्ताविक । शास्त्राधारें बोलावीं ॥*

*	*करूणाकीर्तनाच्या लोटें । कथा करावी घडघडाटें ।*
*श्रोतयांची श्रवणपुटें । आनंदें भरावीं ॥*

*	*वक्तृत्वें निववी जनां । विनीत होऊनी ॥*

*	*जें जें सूक्ष्म नांव घ्यावें । त्याचें रूप बिंबऊन द्यावें ॥*
*तरीच वक्ता म्हणवावें । विचारवंत ॥*

*	*कलयुगीं कीर्तन करावें । केवळ कोमळ कुशळ गावें ।*
*कठीण, कर्कश, कुटें सांडावें । येकीकडे ॥*

*	*बरें बरें बरें म्हणती । बाबा बाबा उदंड करिती ।*

*	*सांडून देव सर्वज्ञ । नादामध्यें व्हावें मग्न ।*
*तें प्रत्यक्ष विघ्न । आडवें आलें ॥*

*	*रागज्ञान ताळज्ञान । स्वरज्ञानेंसी वित्पन्न ।*
*अर्थान्वियाचें कीर्तन । करूं जाणे ॥*
*तालतंबुरे तानमानें । ताळबद्ध तंत गाणें ।*
*तूर्त तार्किक तनेंमनें । तल्लीन होतीं ॥*

*	*थर्थरा थरकती रोमांच । थै थै थै स्वरें उंच ।*
*थिरथिर थिराचे नाच । प्रेमळ भक्तांचा ॥*

*	*दक्षदाक्षण्य दाटलें । बंदे प्रबंदे कोंदाटले ।*
*दमदम दुमदुमों लागलें । जगदांतर ॥*

*	*आपुलिया सुखस्वार्थी । केलीच करावी हरिकथा ।*
*हरिकथेवीण सर्वथा । राहोंचि नये ॥*

*	*भगवंतासी कीर्तन प्रिये । कीर्तनें समाधान होये ।*
*बहुत जनांसी उपाये । हरिकीर्तनें कलियुगीं ॥*

'आठवणींतले आंगण' (पृष्ठ. १५१-१५६)

अशा पद्धतीने अरूणा ढेरे यांच्या लेखनाला काव्याने वेढलेले आहे व लेखन यथार्थ व वाचकाच्या हृदयाचा ठाव घेणारे असे ठरले आहे. मानवी मनाला काव्याची ओढ असते. फक्त लेखनातून आपल्या भावना वाचकांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य लेखक करू शकतो. पण ते लेखन वाचण्यासाठी तितकाच रसिक वाचक असावा लागतो. पण जर काव्याचा

शिडकावा लेखनात असेल तर, रसिक वाचकापेक्षा साधा वाचक त्या लेखनाकडे आकर्षला जातो. व तो रसिक वाचक बनतो. त्याला वरची पदवी मिळते, वाचकाचा सानुभव व कवितेच्या दोन ओळींतून समजलेला जीवनवाद त्याला खूप काही शिकवून जातो.

अरूणा ढेरे यांच्या लेखनातून बालमनाला भावतील अशा कविता, दिव्य व गूढार्थ प्रकट करणाऱ्या कविता, निसर्गवर्णन करणाऱ्या कविता, जीवन तत्वज्ञान स्पष्ट करणारे संत कबीरांचे दोहे, अक्क महादेवींची वचने व संत रामदासांचे श्लोक, महादेवी वर्मा या हिंदी कवयित्रीच्या कविता, कालची कविता व आजची कविता यांच्यातील भेद स्पष्ट मांडणारी य. न. केळकरांची कविता, मुक्तेश्वरांचे विश्ववर्णन, या साऱ्यांचा वापर आपल्या लेखनामध्ये लेखिकेने चपलखपणे केला आहे. काव्याची किनार, संत वचने, श्लोक यांचा शिडकावा, हिंदी कविता, स्पष्ट कविता, निसर्ग कविता, जीवन तत्वज्ञान स्पष्ट करणाऱ्या कविता या साऱ्यांची कमान करून लेखिकेने आपल्याला दिसलेले जग, भावलेले विचार मांडलेले आहेत. सुंदर नक्षीकाम केलेला उत्कृष्ट नमुना व अरूणा ढेरेंचे लेखन यांची तुलना केली तर लेखन हे त्या नक्षीकामासारखेच न ठरले तरच नवल!

**वेध घेणारी भाषा –**

हृदयाचा ठाव घेणारी भाषा, भविष्याचा वेध घेणारी भाषा, निसर्गातून मानवी जीवनाला नकळत बोध देणारी भाषा, साधी, सरळ सोपी आकलनात्मक भाषा, शहरी, संस्कृतप्रचुर अनाकलनीय भाषा, शाश्वत आणि अशाश्वत यांमधील फरक व सत्यता पडताळून दाखवणारी भाषा, वाचकमनाचा तळ गाठणारी भाषा, स्वत:तून निर्माण होऊन विश्वाची वाटणारी अनुभवसमृद्ध भाषा, ग्रामसंस्कृती जपणारी व शहरी भाषेतून ग्रामजीवन

अनुभवावयास लावणारी भाषा अशा प्रकारे अरूणा ढेरेंच्या भाषेची विविध रुपे आपल्याला 'मनातले आभाळ' व 'आठवणींतले आंगण' यांमधून पहावयास मिळते.

वाचता वाचता विचार करायला शिकवणारी भाषा, जीवन मार्ग दाखवणारी भाषा, साधी, सरळ, सोपी भाषा, कमीत कमी शब्दात जास्त आशय सांगणारी भाषा, पूर्वीचे ग्रामजीवन व आजचे ग्रामजीवन यांच्यातील फरक स्पष्ट करून दाखवणारी भाषा लेखिकेच्या लेखनातून प्रकटते.

काव्यात्मक भाषा, जीवनवादी भाषा, तत्वज्ञानात्मक भाषा, हिंदी भाषा, संस्कृत भाषा, ओवीबद्‌ध भाषा, इंग्रजी भाषा, या सर्वांचा उल्लेख लेखनात आलेला आहे. आपल्याला जे मांडायचं आहे ते स्पष्टपणे मांडलेलं आहे. कोणत्याही एका भाषेत साचेबंद लेखन केलेले नाही तर भाषा वापरामध्ये मुक्तत्व स्विकारलेले आहे.

त्यांची भाषाही नागर, प्रमाण बोली जरी असली तरी तिच्यामधून व्यक्त होणारे वर्णन हे ग्रामजीवनातील असल्यामुळे शहरी वाचकांबरोबरच ग्रामीण वाचक देखील हे लेखन आत्मीयतेने व आपल्याच दैनंदिन जीवनातील घटना आहेत अशी भावना ठेवून वाचन करतो.

**अनुभव अभिव्यक्तीची रचना**

लेखिका आपण अनुभवलेले जग, स्वत:ला दिसलेला समाजाचा अनमोल ठेवा यांचे चित्रण आपल्या लेखनात करते. अनुभवातून शिकावयाचे तत्वज्ञान, जाणवलेली मूल्ये प्रकट झालेली आपल्याला दिसतात.

''साहित्याची भाषा, प्रतिमा, तिचे स्थान व कार्य, सौंदर्य संघटनेचे भान, कलात्मक घटकांचे बदलते स्थान, आत्मशोधाची जाणीव, अंतर्मनाच्या सुप्त-अर्धसुप्त

पापुद्र्यांची जाणीव, मन:पूर्वकतेची, आत्मनिष्ठतेने अनुभव व्यक्त करण्याची मातब्बरी यांच्यामुळे नवसाहित्य उजळून निघाले. या आनुषंगिक गोष्टींमुळे साहित्यातील 'मी'त्व व विषयवस्तू ही दोन्ही सतेजरुपे धारण करून लेखनातून अवतरतात.''[२]

लेखिकेच्या बालपणी जपानहून परत येताना तिला तेथील मित्र-मैत्रिणींनी एक अल्बम हातात दिला. ''नाजुक पिवळा रंग, वर फिकी गुलाबी छटा असलेलं आभाळ, खाली थोडी हिरवळ, चार-दोन घरं आणि आभाळात उंच तरगंणारे फुगे. आभाळाच्या एका कोपऱ्यात लहानशा चार ओळी होत्या.

*"It's the young leaves season.*
*I sometimes remember my country*
*Then a balloon hang in the air*
*High up in the sky..........*

मी अगदी मनापासून हलून गेले. खूप लहान असताना मला पतंग उडवायला शिकायची भारी हौस होती. आमच्या ओळखीचा एक मुलगा माझ्यापेक्षा थोडा मोठा, मला पतंग उडवायला घेऊन जाई. पण दोरी धरून खोचण्यापेक्षा तो लाल-पिवळा हलता चौकोन उंच लहरत जाताना पाहूनच पोटात काही तरी होत रहायचं खांद्याला पंख फुटताहेतसं वाटायचं. जमिनीवरून पाय सुटण्याची थोडी थरथरही त्यात असायची. तो सगळा अनुभव त्या अल्बमवरच्या चार ओळींनी मला पुन्हा एकदा दिला.''

'मनातलं आभाळ'(पृष्ठ.क्र १४)

अशा प्रकारे प्रसंगा प्रसंगातून लेखिकेने आपल्याला आलेल्या अनुभव अभिव्यक्तीची रचना लेखनात चपलखपणे केलेली आहे. त्याबरोबरच लेखिकेने आपल्या जीवनात आलेल्या अनुभव अभिव्यक्तीची रचना लेखनात केलेली दिसून येते.

भाषा :

स्वतःच्या लेखनामध्ये लेखक / लेखिका हे मानवी जीवनाचे स्वभावाचे चित्रण करून जीवनदृष्टी वाचकाला प्रदान करित असतात. प्रसंगांचे किंवा मानवी स्वभावाचे, भावभावना, शाश्वत–अशाश्वत विचार, काल आणि आज यांतील फरक, वास्तव व हुबेहुब चित्रण, लालित्यपूर्ण भाषा वापरून ललित लेखन चित्ताकर्षक केले जाते. ते साध्य करण्यासाठी तितक्याच ताकदीची व वर्णनातून दृश्य निर्माण करणारी, वाचकाला स्वतःमध्ये डोकावायला भाग पाडणारी अशी भाषा लेखनात असावी लागते. भाषेच्या माध्यमातून जीवन–विश्व, भाव–विश्व वाचकासमोर चित्रित होत असते. त्यामुळे ललितची भाषा ही एक महत्वाचा घटक आहे.

लेखनाची भाषा ही लिहिणाऱ्याच्या उद्दिष्टानुसार व विचारानुसार प्रकट होत असते. याबाबतीत एक महत्वाचा मुद्दा सांगताना ना.सी फडके म्हणतात की, 'ज्याप्रमाणे प्रसंगांशी त्याप्रमाणेच जी व्यक्ती बोलत असेल त्याच्या व्यक्तीवैशिष्ट्यांशी भाषेने संवादित्व राखले पाहिजे.'[3]

'मनातलं आभाळ' व 'आठवणींतले आंगण' मधील निवेदनाची भाषा ग्रामीण वातावरण चित्रित करणारी आहे. वाक्प्रचार, म्हणी, चटकदार व नाट्यपूर्ण संवाद, व्यक्ती आणि प्रसंगातून शब्द योजना ही 'मनातलं आभाळ' व 'आठवणींतले आंगण' या ललित लेखसंग्रहातील ही भाषेची वैशिष्टये म्हणावी लागतात.

'मनातलं आभाळ' व 'आठवणींतले आंगण' मधील भाषा निवेदनाची ग्रामीण वातावरण चित्रित करणारी आहे. वाक्प्रचार, म्हणी, चटकदार व नाट्यपूर्ण संवाद, व्यक्ती

आणि प्रसंगातून शब्द योजना ही 'आठवणींतले आंगण' व 'मनातलं आभाळ' या ललित लेखसंग्रहातील ही भाषेची वैशिष्टये म्हणावी लागतात.

या ललितलेखसंग्रहामध्ये म्हणींचा वापर केल्याचे दिसून येते. या पुस्तकांमध्ये ग्रामसंस्कृतीचे, लोकसाहित्याचे चित्रण आल्याने लेखन सरस ठरते. लोकमानस लक्षात घेऊन साहित्यामध्ये भाषाशैली वापरावयाची असते. भाषाशैलीला साहित्यात अनन्यसाधारण महत्व आहे. मानवी मनावर अधिराज्य गाजवणारे ते एक माध्यम आहे. त्या माध्यमाचा प्रभाव लोकमनावर होत असतो. लेखिकेने लोकांच्या मनाचा ठाव घेणारे व हृदयातून लेखन केलेले आहे. वाचताना वाचकाची उत्सुकता, जागरूकता व आपुलकी वाढत जाते.

''ललित वाङःमयाचा भाषेचे विशेष, प्रासाद आणि लालित्य हे असले पाहिजेत. घरगुतीपणा / सोपेपणा नव्हे. ऑस्कर, वाइल्ड, मेरेडिथ किंवा हार्डी यांच्या ललितकृती जर आपण पाहिल्या, तर असे दिसून येईल की, त्यातील भाषा ही सुसंस्कृत वाचकांना आल्हाद देणारी अभिजात अशीच आहे. त्यातून क्वचित घरगुती शब्दप्रयोग वापरलेले असले तरी, अभिजातपणा हेच खरोखरी त्या भाषाशैलीचे वैशिष्टय होय.''[४]

# संदर्भ सुची


१. माडखोलकर ग.त्र्यं. : जीवन साहित्य
कॉन्टिनेन्टल प्रकाशन
पृ.९४.

२. यादव आनंद : 'ललित गद्याचे तात्विक स्वरूप आणि मराठी लघुनिबंधाचा इतिहास.'
पृ.३९.

३. फडके ना.सी. : 'उ.नि.'
पृ.२२१.

४. माडखोलकर ग.त्र्यं. : जीवन साहित्य
कॉन्टिनेन्टल प्रकाशन
पृ.९५,९६.

५. ढेरे अरूणा : मनातलं आभाळ
मंजुल प्रकाशन, पुणे.
द्वितीयावृत्ती ३१ ऑगस्ट २००३

६. ढेरे अरूणा : 'आठवणींतले आंगण'
पद्मगंधा प्रकाशन, पुणे.
१६ ऑगस्ट १९९९.